

# समुद्रसूक्त !

## प्रकाश गोळे

मराठीत 'अ'पासून सुरुवात होणारे काही शब्द आहेत : असीम, अथांग, अगणित, अवाढव्य वगैरे. ही विशेषणे पूर्ण सार्थ करून दाखविणारं पृथ्वीवर कोणी असेल तर तो फक्त सागरच. वरील शब्दांमध्ये 'अवर्णनीय', 'अनाकलनीय' या शब्दांचीही भर घालायला पाहिजे. कारण सागराकडे दृष्टी जाताच पहिली कोणती गोष्ट मला जाणवली असेल तर ती म्हणजे त्याचं रूप शब्दांत पकडणं अशक्य आहे; त्याचा विस्तार आणि खोली, मानवी मन आणि बुद्धी यांच्या आवाक्यापलीकडची आहेत. त्याचं सतत वरखाली होणारं, हेलावणारं शरीर पाहून घट्ट, कधीच न हलणाऱ्या जमिनीवर राहण्याची सवय असलेल्या मला तर भीतीच वाटली. त्याचा गहिरा, सारं काही गिळून टाकण्यास केव्हाही सज्ज असलेला पाणपसारा पाहून ती दृढही झाली. पण अनाकलनीय, भीती घालणाऱ्या गोष्टी मनाची उत्कंठा अधिकच वाढवितात, त्यांच्या दिशेनं आपली पावलं आपोआप खेचली जातात. तसं झालं माझं.

सागरतीरी, कोकणच्या किनाऱ्यावर मी पोहोचलो तेव्हा ओहोटीला सुरुवात होत होती. पुढे पुढे येऊ पाहणाऱ्या लाटा दरक्षणी खरोखर मागे सरकत आहेत, हे मला माहीत होते. वाळूचा भाग उघडा पडत होता आणि त्या पुळणीवर माझे पाऊल पुढे पडत होते. बाजूच्या खडकांवर लाटा आपटत होत्या, तुषार उडत होते आणि लाटांचा मारा सहन करीत ते खडक उभेच होते, स्थितप्रज्ञासारखे ! आज नाही, काल नाही, तर गेली शेकडो-हजारो वर्षे हे असेच चालू असणार, माझ्या मनात विचार आला. मी वळून मागे पाहिले. पूर्वेला सह्याद्रीचा उभा कडा मला जणू धीर देत होता – पायांखालच्या सतत सरकणाऱ्या अस्थिर जगात तू शिरलास तरी मी स्थिर आहे, तुझे आश्रयस्थान आहे, असे जणू सांगत होता.

अशी कल्पना करणं शक्य होतं की इथं जणू पर्वत आणि सागर यांचं युद्ध सुरू आहे. पर्वताच्या बिनीच्या तुकड्या असलेले हे खडक लाटांचा मारा लीलया झेलत ठाम उभे आहेत. तसूभरही जागा सागराला मिळू नये, असा प्रयत्न आहे त्यांचा. लाखो नव्हे, कोट्यवधी वर्षे हे युद्ध चालू आहे, असेच चालणार आहे. सतत चालणाऱ्या या द्वंद्वाला युद्ध तरी म्हणायचं का? या न संपणाऱ्या धुसफुशीचं कारण तरी काय असावं? खरं तर एकाच पृथ्वीची ही अपत्यं. कदाचित जुळीही असतील. अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीचा तप्त गोलक जेव्हा शांत, थंड होऊ लागला, तेव्हा खडक, पर्वत आकार धरू लागले आणि थंड होण्याच्या क्रियेमुळे जी वाफ वातावरणात शिरली, तिचे रूपांतर पाण्याच्या बिंदूंत झाले. ते पृथ्वीवर परतले. या बिंदूंनीच सागराला जन्म दिला आणि खडकांना, पर्वतांना जणू आधार दिला, तोलून धरले. बहुप्रसवा पृथ्वीच्या गर्भातल्या हालचाली चालूच राहिल्या. त्यांनी खडक-पर्वतांना सागराच्या स्वाधीन केले तर कधी त्यांना वर काढून सागराला हटविले.

मात्र या साऱ्या घडामोडी पाहायला कोणीच सजीव हजर नव्हता. सजीवानं त्या वेळी हजर असणं ही गोष्टच विश्वाच्या नियमांत बसणारी नव्हती !

तरीही मला आता माहीत होतं की ज्या कोकणच्या किनाऱ्यावर मी आज उभा होतो, तो त्या वेळी नव्हे, तर त्यानंतर कोट्यवधी वर्षेही इथे नव्हताच. माझ्यासमोर पसरलेला हा सागरही इथे नव्हता. पण तरीही कोणीच मला परके नव्हते. ही जाणीव झाली तसं हायसं वाटलं. भोवतालच्या गर्दीत ओळखीचा चेहरा दिसला म्हणजे वाटतं, तसं वाटलं. माझ्या पायांखालची भूमी आता सरसर सरकू लागली. तरीही मला भीती वाटली नाही. सरकणाऱ्या भूमीबरोबर माझे मनही झपाट्याने भूतकाळात शिरू लागले. फार वेगाने आम्ही दक्षिणेकडे निघालो; आणि एक वेगळेचं खंड क्षितिजावर उमटू लागले. लवकरच मी उभा असलेला भूभाग या खंडात सामावून गेला. मी पार विषुववृत्ताच्याही खाली, आता आफ्रिकेचा दक्षिण भाग जिथे आहे, तिथे कोठेतरी पोहोचलो असेन. इथे हवा जास्तच उष्ण, दमट होती, पाऊसही रोज हजेरी लावीत होता. एका निराळ्याच प्राणी आणि वनस्पती सृष्टीचं दर्शन मला प्रत्यही घडत होतं. या वातावरणात मी किती वेळ काढला कोणास ठाऊक, पण माझ्या भोवतालच्या मातीचं कडक, तांबडट-काळपट खडकांत रूपांतर होतंय्

हे मला जाणवत होतं. आपण त्या खंडापासून विलग होतोय् असंही वाटत होतं. आणि एक दिवस अचानक मला सागराचं दर्शन झालं. ते खंड आणि मी यांच्यामध्ये तो उभा ठाकलेला मला दिसला. पृथ्वीच्या गर्भातील हालचालींनीच ही किमया घडवून आणली होती. तसूतसूनं सागर पुढं सरकतोय असं वाटलं मला; की मी सरकत होतो ? खरोखर माझाच प्रवास आता उत्तरेकडे चालू झाला होता. क्षितिजावर पसरलेला सागर माझी सोबत करीत होता, पण त्याचा किनारा माझ्यापासून अजून दूर होता.

असा प्रवास चालू असतानाच एकाएकी पृथ्वी गदगदू लागली. माझ्याभोवती धुराचे कल्लोळ उठले, प्रचंड वेगाने अग्नीचे स्फुल्लिंग आकाशात भिरकावले गेले आणि भूमी ठिकठिकाणी उसवली गेली. तिला पडलेल्या लांब-रुंद भेगांमधून तप्त रस वाहू लागला आणि कराकरां पेटत चाललेल्या जंगलाच्या घुसमटीत आणि जिवाच्या आकांतानं टाहो फोडणाऱ्या जनावरं-पाखरांच्या किंकाळ्यांनी सारी सृष्टी आक्रंदू लागली. नंतर मात्र ही आग हळूहळू विझत गेली. तप्त रसाचे लोळ थंड होऊ लागले, एका जागी स्थिरावले. एका बाजूला माझ्या अवती-भवती टेकड्या, पर्वतांचे आकार बाळसं धरू लागले होते, तर दुसरीकडे माझ्या पायांखालची जमीन एका बाजूने झुकू लागली होती. दूरवर उभ्या ठाकलेल्या समुद्राचे अस्तित्व मला आता जाणवू लागले. तो सावकाश माझ्या दिशेनं सरकत होता.

समुद्र जसा जवळ येत होता, तसा वातावरणात सुखद गारव्याचा शिडकावा आला. समुद्राकडून येणारे शीतल वारे तप्त भूमीचा दाह कमी करू लागले. वाऱ्यापाठोपाठ निळे-काळे ढग आले, वातावरणात ओलावा आला आणि लवकरच माझ्याभोवतालचे खडक, टेकड्या पाण्याने न्हाऊन, माखून निघाल्या. आता हे नित्याचेच झाले. प्रखर उन्हाने भूमी, खडक तापावे, आणि नंतर ढगांबरोबर येणाऱ्या पावसाने त्यांना शांत, शीतल करावे. तापलेले खडक थंड होतानां मात्र त्यांना चिरा गेल्या, भेगा पडल्या आणि त्यातून त्यांची लहान-मोठी शकले वेगळी झाली. पाण्याच्या प्रवाहाबरोबर डोंगर-उतारांवरून ती कोलमडू लागली. आणखी छिन्नविच्छिन्न झाली आणि त्यांचे कण न् कण पाण्यात मिसळून निर्झरांबरोबर धावू लागले, धबधब्यातून कोसळले आणि नदीत जाऊन मिसळले. नदीबरोबर ज्यांचा प्रवास चालू झाला, तिथेही लहान-मोठे वेगळे झाले. मोठे कुठे कुठे अडकले, रुतले, पसरले तर लहान वाहत वाहत पुढे गेले.

नदीला ओढ लागली होती सपाटीची, सखलपणाची. पाण्याचे थेंब ढगांतून आभाळात गेले, उंच पर्वतांवर उतरले तरी त्यांना ओढ मायभूमीचीच. सागराला ठाऊक होतं की आपल्या इतकं सपाट, सखल काहीच नाही. आपणच निर्माण केलेले, ढगातून भूमीवर धाडून दिलेले थेंब आपल्याकडेच परत येणार. आणि झालेही तसेच. डोंगरांतून निघालेल्या नद्या-ओढ्यांनी वळणावळणाने का होईना, सागराचाच रस्ता धरला आणि नदीत मिसळलेला कण न् कण तीच वाट चालू लागला. त्यातलेच काही नदीबरोबर सागरकिनाऱ्यावर आले, सागरात मिसळले. लाटांबरोबर उचलले गेले आणि किनाऱ्यावर पुन्हा फेकले गेले.

अशा असंख्य कणांनी तयार केलेल्या वाळूच्या एका पुळणीवरच मी आज उभा होतो. लाटा हलकेच माझ्या पायाला स्पर्श करीत होत्या, आपल्याबरोबर आलेल्या असंख्य कणांची पुटं पायांवर चढवीत होत्या आणि परतत होत्या. ओहोटी अजून चालूच होती आणि मागे सरणाऱ्या समुद्राला शोधत मीही भूमीपासून बराच दूर झालो होतो.

एवढ्यात माझ्या पायाला थंड, लुसलुशीत जिवंत मांसाचा स्पर्श झाला आणि भूतकाळात हरवलेले, या सागराच्या आणि सह्याद्रीच्या जन्माचा आणि त्याही आधीच्या भूमीचा वेध घेणारे माझे मन एकदम जागे झाले !

कुठे आहे मी ? दचकून मी सभोवार पाहिले. माझ्या पायाशी वाळूतच एक उथळ खड्डा होता. लाटांनी आणलेले पाणी त्यात साचले होते आणि असंख्य लहानलहान शंखांचा त्यात सडा पडला होता. आश्चर्य म्हणजे ते सारे रांगत होते, वळत होते, चालत होते. प्रत्येक शंखात किडा होता, खेकडा होता. त्या छोट्याशा जलाशयाच्या काठात चार-पाच समुद्रतारका अर्धवट मातीत रुतल्या होत्या आणि काठावर एक-दोन पूर्ण पारदर्शक भिंगे पडली होती. सागराने खुली केलेली ही प्राणिसृष्टी पाहून मन थक्क झाले, आनंदले. पारदर्शक भिंगासारखे दिसणारे 'स्टेनोफोर' मी प्रथमच पाहत होतो. आता आणखी काय काय पाहायला मिळणार, या उत्सुकतेने मी पुढे पाऊल घातले.

आज समुद्रतारका आणि स्टेनोफोर यांचाच दिवस असावा. कारण दर दहा पावलात ते कितीदा तरी भेटत होते. त्याशिवाय लहान-मोठे शंख आणि शिंपले लाटांबरोबर वाहत येत होते. एक-दोन खळग्यातून जेलीफिश दिसले आणि एका लाटेबरोबर तर छोटासा ऑक्टोपसच किनाऱ्यापर्यंत आला. मी त्याला हलकेच ओंजळीत पकडला आणि सोडून दिला. सागराची ही ओळख अपूर्व होती.

पुळणीच्या एका बाजूला खडक होते. लहान-मोठे गोटे आपली तुकतुकीत शरीरे उघडी करून पहुडले होते. त्यामधल्या खोलगटीत पाण्याचे लहान लहान तलाव साचले होते. इथे काय सापडेल बरं ? ओहोटीने खुलं केलेलं हे जग पाहण्यास मी अधिर झालो होतो.

माझ्या जवळच्याच खडकाला एवढे कंगोरे कसे म्हणून मी स्पर्श केला. त्या वेळी जाणीव झाली की असंख्य सूक्ष्म नळ्यांनी तो खडक व्यापला आहे. प्रवाळ तर नसेल हे ? पण ते प्रवाळ नव्हते. सॅबिलॅरिआ नावाच्या सूक्ष्म जीवांनी वाळूचे कण आपल्या लाळेने एकत्र करून या नळ्या तयार केल्या होत्या. स्वतःला राहण्यासाठी. लाटांचा मारा होणारे खडक हेच त्यांच्या आवडीचे ठिकाण. लाटाच त्यांना अन्न आणि घर बांधायची सामग्री पुरवितात. लाटांचा मारा सहन करून किनाऱ्याची धूप कमी ठेवण्याचं महत्कार्य हे चिमुकले जीव करतात.

सॅबिलॅरिआने आच्छादिलेल्या खडकातून वाट काढता काढताच समुद्रकाकड्या भेटू लागल्या ! लांब काकडीच्या आकाराचा, लिवलिवित शरीराचा आणि तोंडाजवळ मिशा असलेला हा विचित्र प्राणी खडकांच्या सांदिकोपऱ्यात, फटीतून आणि वळचणीला दडला होता, आपल्या मिशांनी पाण्यातले अन्नकण शोधीत होता. खडकांमधल्या चिखलातून आपल्यामागे स्वतःच्या पायवाटा रुळविणारे आणि चिखलाच्या गोळ्यासारखेच दिसणारे ॲकिडियम होते. छोट्या दगडांखाली खेकडे, शिंपले आणि लांब काटेरी पायांचे समुद्रतारे होते.

दोन दगडांमध्ये पाणी साचून तयार झालेले तलाव हे आणखीनच निराळे जग होते. त्यामध्ये रूपेरी, मोरपंखी आणि पारदर्शक शरीराचे लहानगे मासे पोहत होते, तर त्याहून मोठे मासे मधूनच सुळकांडी मारून दगडांमधल्या सापटीत अदृश्य होत होते. चिनी शेतकऱ्यांच्या टोपीच्या आकाराचे असंख्य लिम्पेट खडकांना घट्ट धरून होते, तर सीस्क्वर्टच्या नळ्या अधूनमधून विखुरल्या होत्या. सपाट खडकांवर झू-अँथस्‌ची मखमली नक्षी गालिचासारखी पसरलेली पाहून तर मन वेडे होत होते. आणि उलटी तोंडे पाण्यात बुडवून खडकांना धरून असलेले असंख्य तांबडे आणि पांढरे ॲनिमोन मला चकित करीत होते. एका रुंदशा कपारीला चिकटले होते चार-पाच काटेरी चेंडू! सी अर्चिन म्हणून प्रसिद्ध असलेला हा आणखी एक प्राणी!!

सागरी प्राणीसृष्टीतली ही विविधता स्तिमित करणारी होती. मनात विचार आला, जगातला कुठलाही आकार, आकृतिबंध सजीव करण्याचे सामर्थ्य सागरात आहे. उगीच नाही माणसाला संशय येत की प्रचंड लांबीचे आणि विलक्षण चेहरे असलेले सर्प, सरडे आणि डिनोसॉरसारखे प्राणी सागरात दडलेले आहेत!

मी आता माझा मोर्चा मोठ्या खडकांकडे वळविला. एकमेकांवर कुरघोडी करणारे हे पाषाण सागराच्या दिशेने नतमस्तक झाले होते, लाटांनी पिटून त्यांचे सपाट फलाट केले होते. त्यामध्येही खळगे पाडले होते आणि भरती-ओहोटीबरोबर ते सतत पाण्याने भरले जात होते, उघडे पडत होते. सतत बदलते वातावरण, कधी पूर तर कधी कोरडेपणा, कधी थंडी तर कधी उष्मा असे बदल इथे रोजचे होते.

झूॲन्थसच्या रूपाने मी आतापर्यंत पाण्यातले मखमली गालिचे पाहत होतो, पण इथे, या खडकांवर माझ्या पायाखाली मखमल पसरली होती. उल्वा नावाच्या वनस्पतीने इथल्या खडकांना हिरव्यागार कुरणाचे रूप दिले होते. खोड, मूळ, फांद्या, पाने असे कुठलेच अवयव वेगळे नसणारी ही वनस्पती म्हणजे अल्गी. समुद्राच्या पोटात या अल्गीची प्रचंड जंगले आहेत. काही अल्गे तर कित्येक किलोमीटर लांबीचे आहेत. जमिनीवरची सर्व जंगले एकत्र केली तरी त्यांचा विस्तार सागरातील जंगलांपेक्षा कमीच भरेल. उल्वाचे कुरण ही तर त्या जंगलाची नुसती सुरुवात होती. खडकात साठलेल्या प्रत्येक डबक्यातून, तलावातून अल्गीच्या निरनिराळ्या जाती इथे होत्या. लालसर, तपकिरी, करडा, हिरवा, निळसर-हिरवा अशा रंगांच्या. समुद्राच्या लाटा जिथे खडकांवर अजूनही धडका घेत होत्या, तिथे सरगॅसम या पिवळट-तपकिरी अल्गीच्या झिरमिळ्या लोंबत होत्या. इथूनच या जंगलांना सुरुवात होत होती. अल्गीची घनदाट जंगले समुद्राच्या पोटात शिरल्याशिवाय दिसणं शक्य नव्हतं. या जंगलांमध्ये जे जीव, जीवाणू, मत्स्य, कासवे, समुद्रगायी आणि इतर असंख्य प्राणी राहत होते, त्यांवर जगत होते, त्यांची मोजदाद करणेही शक्य नव्हते!

लाटांच्या धडका हेच ज्यांचे जीवन आहे, त्या बार्नॅकल या शंकूच्या आकाराच्या घरात राहणाऱ्या प्राण्यांचा निवास याच खडकांवर होता. इथे लाट फुटली की या शंकूंची तोंडे उघडली जाणार होती आणि लाटांनी फेकलेले अन्नकण आतला प्राणी झेलून घेणार होता. खडकांना चिकटून राहिलेले ऑयस्टरचे शिंपलेही लाटांची यासाठीच वाट पाहत

## केतकीच्या बनात

**जगदीश पाटील**

•

केतकीच्या बनात
दिवसा फुले रात्रीसाठी झोपतात
संध्याकाळी घाईने उठतात
न्हाऊन माखून तयार होतात
उसन्या सुगंधात पार दरवळतात
सूर्य थबकून थोडा गरकन
मग बुडी मारतो
फुलं शेजेवर अंथरतात
फुलं दारात बसतात
फुलं ओटीवर उभं राहतात
उभं राहून हाक मारतात
नि थकून जातात
दूर कुठेतरी हरवून जातात
केतकीच्या बनातले!
नाग फुत्कार टाकतात
रात्रभर लोळत पडतात
दंश करून जातात
फुलांना जहर माखून जातात
सूर्य चढतो आभाळावर
क्षीण उतरतो डोळ्यावर
तरी—
केतकीच्या बनातले!
फुलं मोहरून येतात
शंभराच्या नोटा गंधाळून जातात
नोटेवरचा महात्मा निर्मळ हासतो
'बा'च्या डोळ्यात पाझरून येतो
मनीऑर्डरी मार्गी लागतात
दूरच्या झाडाला बहर फुटतो
थांबलेला आवंढा गिळून येतो
विस्कटलेली रेषा जुळून येते
जुळलेली कळी खळून येते
ही फुलं कोणी तोडून आणली
माहीत नाही.
पुढची फुलं कदाचित झाड
स्वतः आणून देईलही!
केतकीच्या बनातले!

**शैक्षणिक समस्या**

एक छोकरा दुकानातून घड्याळ चोरताना पकडला गेला. पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनमध्ये नेऊन लॉकअपमध्ये टाकले. तेथे असलेल्या एका अट्टल गुन्हेगाराला त्या छोकऱ्याबद्दल सहानुभूती वाटली. तो म्हणाला, "अरे पोरा, अशा लहानसहान चोऱ्या काय करतोस? त्यात काही दम नाही. त्यापेक्षा एखाद्या बँकेवर दरोडा का नाही घालत?"

छोकरा उत्तरला, "काय करणार? संध्याकाळी शाळा सुटेपर्यंत सगळ्या बँका बंद झालेल्या असतात."

होते. खडकांवर लीलया वावरणारे उग्र रंगाचे, अक्कडबाज खेकडे एवढ्याचसाठी लाटा अंगावर घेत होते.

खडकांवरची ही विविधता पाहत मी किती पुढे सरकलो होतो कोणास ठाऊक, कारण एक लाट आता माझ्या अंगावरच फुटली आणि मला सचैल समुद्रस्नान घडले. मी समुद्राकडे पाहिलं तर लाटा आता खदखदत होत्या, पुढे झेप टाकायला उत्सुक होत्या, ओहोटी संपून भरती सुरू झाल्याची निशाणी होती ती! समुद्र जणू इशारा देत होता, 'बाहेर व्हा! मी माझ्या खजिन्याची कवाडे बंद करणार आहे.' लाटांचे पडदेच्या पडदे पसरले जाऊन त्याखाली आता सारे अदृश्य होणार होते. एकेकाला गोळा करून सागर त्यांना दूर, अज्ञातस्थळी घेऊन जाणार होता.

मी परत फिरलो. सारे झाकले जाण्यापूर्वी पुन्हा एकदा पाहून घ्यावे म्हणून ते खडक त्यामधले खळगे, दोन पाषाणांमधले जलाशय, त्यांच्यातल्या सांदीफटी सारे पाहत निघालो. मनात विचार मात्र घोळत होता की परतच न्यायचं होतं या सर्वांना, तर सागरानं त्यांना इथं आणून सोडलं कशासाठी? मला पाहता यावं म्हणून? हा विचार तर हास्यास्पदच होता. मग कशासाठी हे प्राणी इथं कडमडले असतील?

खडकांना ओलांडून मी पुळणीवर आलो आणि तिच्या एका टोकाशी वसलेल्या गावाकडे निघालो. गाव वसलं होत खाडीच्या तीराशी. त्याच्या एका बाजूला सागर होता तर दुसऱ्या बाजूकडून एक नदी सागराला येऊन मिळत होती. नदीने आणलेलं गोडं पाणी आणि समुद्राचे खारे पाणी यांचा संगम होऊन एक मजेदारच जलधी तयार झाला होता. इथे लाटा एका दिशेने झेपावत नव्हत्या. तर त्या नाचत होत्या, पाणी उचंबळत होते, तिथल्या तिथे फिरत होते आणि लाटांचे नुसते कंगोरेच पाण्यावर उमटत होते. इथे सागराचा जोश, आवेश, त्वेष नव्हता, तर इथे होते नर्तक, क्रीडा आणि आनंद म्हणूनच की काय कोण जाणे, डॉल्फिन किंवा गाद्यामाशांचा एक थवा खाडीच्या मुखाशी मनसोक्त डुंबत होता, खेळत होता, पाण्यातून उंच उशा घेऊन धाडकन् पाण्यात पडत होता.

खाडीचे मुख उथळ होते. इथे वाळूचा एक बांध तयार झाला होता. भरतीचे पाणी त्यावरून खाडीत शिरू पाहत होते. तर खाडीचे पाणी त्याला हलकेच लोटू पाहत होते. त्यात सरशी कोणाची होणार हे उघड होते. सागराच्या भरतीबरोबर खाडीलाही पूर येणार होता आणि खारे पाणी आत दूरवर घुसणार होते. ओहोटीमुळे उघडे पडलेले कित्येक किनारे आता पाण्याखाली जाणार होते.

खाडीच्या मुखाशी बंदर होते. अनेक नौका तिथे उभ्या होत्या. भरतीबरोबर आत जाण्यासाठी त्या सज्ज होत्या. मलाही भरतीबरोबर खाडीत आतच शिरायचे होते. सागर-सरितेची भेट डोळे भरून पाहण्यासाठी.

आमच्या नौकेचा प्रवास सुरू झाला तेव्हा खाडीकाठच्या दाट, मऊ चिखलाच्या किनाऱ्यात भरतीचे पाणी घुसू लागले होते. इथे शिंपले गोळा करण्यासाठी आलेले कित्येक स्त्री-पुरुष भरती येऊ लागली तसे गावाकडे परतू लागले. हे चिखलाचे काठ अनेक सागरी जीवांचे आसरे होते, तसे अनेक माणसांचेही पोशिंदे होते. नौका आणखी पुढे गेली तर खाडीचे दोन्ही तीर आता खारफुटीच्या जंगलांनी व्यापलेले दिसले. त्यांच्यामागे डोंगर होते आणि त्यावरही घनदाट झाडी होती. भरतीचे पाणी जसे खारफुटीला भिडले तशी तिथे प्रचंड हलचल जाणवली. खारफुटीच्या जंगलात अनेक पक्षी होते. त्यांची धावपळ उडाली. काही पाण्यावर सूर मारू लागले. तर काही आकाशात गिरक्या घेऊ लागले. खारं आणि गोड्या पाण्याच्या संगमातून जो तो काही मिळविण्यासाठी धडपड करीत होता. आता नौकेच्या दोन्ही बाजूला माशांचे थवे पोहोताना दिसू लागले. कित्येक मासे समुद्राच्या पाण्यावर झरझर पळत होते. तर कित्येक पाण्यामधून उशी घेऊन हवेत उंच उडत होते. एक-दोनदा तर मला सरसर पोहत जाणारे समुद्रसर्प दिसले. असं वाटत होतं की भरतीबरोबर जो तो खाडीत जायला पाहतोय. असं काय मिळवायचं असेल खाडीत त्यांना?

आणि एकदम मला डोंगरातून पाण्याबरोबर वाहत येणारे ते कण न् कण आठवले. डोंगरातून, खडकातून, जंगलातून, झुडुपांतून, कुरणातून, शेतातून, गावातून आणि माळावरून पाण्यात मिसळणारा प्रत्येक कण आपल्याबरोबर काहीतरी द्रव्य, काहीतरी अन्नांश घेऊन येत होता. त्यामध्ये खारफुटीच्या जंगलातले, त्याखालच्या चिखलातले कण मिसळून इथे एक प्रचंड अन्नछत्र तयार झाले होते. समुद्रातले कित्येक जीव त्यावर अवलंबून होते. ओहोटीबरोबर हे अन्नांश समुद्रात जाणार होते. तिथे समुद्राच्या प्रयोगशाळेत निर्मिल्या जाणाऱ्या अन्नात मिसळले जाणार होते आणि हजारो, लाखो प्रकारच्या जीवांना, वनस्पतींना जीवनाधार ठरणार होते.

खडकांना धडका देणाऱ्या लाटा मी प्रथम पाहिल्या तेव्हा मला वाटलं की पर्वत आणि सागर यांत कधी न संपणारे युद्ध चालू आहे, पण ते युद्ध नव्हतेच मुळी. सह्याद्री आपल्याजवळचे सारे काही भरभरून सागराला अर्पण करीत होता, आणि सागरही त्याची सव्याज परतफेड करीत होता. हे द्वंद्व नव्हते, द्वंद्वगीत होते, जीवनसंगीत होते!

■

प्रकाश गोळे, १/ब अभिमानश्री सोसायटी, पाषाण रस्ता, पुणे ४११००८.